(१०)

**विकास योजना - वरोरा (सुधारित) जि. चंद्रपूर**

मौजे खांजी ता. वरोरा येथील सर्व्हे क्र. ४२/२ (भाग), २३८/२अ (भाग), २३८/२ब(भाग) क्षेत्र ५८८८.७५ चौ.मी. जागा आरक्षण क्र. ७० "Housing for Dis-Housed Persons" हे आरक्षण भागश: वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय** क्र.टिपीएस-२२१७/६६८/प्र.क्र.३१०/२०१७/नवि-९

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: २४ जानेवारी, २०१८

**शासन निर्णय** :- सोबतची अधिसूचना (मराठी / इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,***

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

(रा. शा. चौहान)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

३) उप सचिव (नगररचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) विभागीय, सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.

५) मुख्याधिकारी, वरोरा नगर परिषद, वरोरा जिल्हा चंद्रपूर.

६) नगर रचनाकार, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर.

(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या ०५ प्रती शासनास विहीत मार्गाने सत्वर सादर कराव्यात.)

७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, नागपूर.

(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे पाठवाव्यात.)

८) कक्ष अधिकारी, (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.)

९) निवडनस्ती (कार्यासन नवि-९)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - २४ जानेवारी, २०१८**

# अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

क्र.टिपीएस-२२१७/६६८/प्र.क्र.३१०/२०१७/नवि-९: ज्याअर्थी, वरोरा शहराची (सुधारित) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसूचना क्र. टिपीएस-२२१२/५२१(न)/ पुर्नबांध.क्र.५७/प्र.क्र.१०२(अ)/२०१२/नवि-९, दि. २८/१२/२०१२ अन्वये भागश: मंजूर झाली असून ती दि. २७/०१/२०१३ पासून अंमलात आली आहे. आणि वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस-२२१२/५२१(न)/पुर्नबांध.क्र.५७/प्र.क्र.१०२(अ)/२०१२/नवि-९, दि. ०३/०१/२०१५ अन्वये मंजुर झालेली आहे. (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे खांजी ता. वरोरा येथील सर्व्हे क्र. ४२/१(भाग), ४२/२(भाग), २३८/२अ (भाग), २३८/२ब(भाग) क्षेत्र २.४५ हेक्टर जागा आरक्षण क्र. ७० "Housing for Dis-Housed Persons" या आरक्षणामध्ये समाविष्ट आहे (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, वरोरा नगर परिषद यांनी, नियोजन प्राधिकरण म्हणून (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे) म्हणुन, त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १२, दि. १३/०६/२०१६ नुसार उक्त आरक्षणामधुन सर्व्हे क्र. ४२/१(भाग), ४२/२(भाग), २३८/२अ (भाग), २३८/२ब(भाग) चे क्षेत्र ६७३४.७५ चौ. मी. वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे ठरवून, त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन, फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल काही अटीसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांमधील सर्व्हे क्र. ४२/२(भाग), २३८/२अ (भाग), २३८/२ब(भाग) या जमिनीच्या मालकाने सन २०१७-१८ या वर्षातील बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या उक्त क्षेत्राच्या रकमेच्या ५% दराने येणाऱ्या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमुल्याची ५०% रक्कम रुपये ८९,४५०/- नगर रचनाकार, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर यांच्या लेखाशिर्षामध्ये चलन क्र. MH००८२१७५४३, दि. १४/१२/२०१७ अन्वये जमा केलेली आहे. आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये ८९,४५०/- वरोरा नगरपरिषदेकडे पावती क्र. F/१०४/२०९९, दि. २१/१२/२०१७ अन्वये जमा केलेली आहे.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढील प्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दि. २८/१२/२०१२ ची विकास योजना मंजुरीची अधिसुचना सुधारीत करण्यात येत आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT.

C:\2014-2017\Kalam\Notification-5%\खांजी प्र.क्र.310-18.docx

"उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसुचनेच्या फेरबदल सुचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे -

## नोंद

मौजा खांजी ता. वरोरा येथील सर्व्हे क्र. ४२/२(भाग), २३८/२अ (भाग), २३८/२ब(भाग) मधील ५५८८.७५ चौ.मी. जमिन, नकाशात दर्शविल्यानुसार, आरक्षण क्र. ७० "Housing for Dis-Housed Persons" मधुन वगळून खालील अटीस अधिन राहुन रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

***अट क्र. १ -*** *वरोरा शहराच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार, जागेच्या रेखांकनात आवश्यक खुले क्षेत्राव्यतिरिक्त आवश्यक क्षेत्र सार्वजनिक सुविधा क्षेत्रासाठी सोडणे बंधनकारक राहील.*

***अट क्र. २ -*** *उक्त जमिनीसाठी आवश्यक मूलभूत सोयीसुविधा स्वखर्चाने विकसित करणे जमिनमालकांवर बंधनकारक राहील.*

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना / भाग नकाशा मुख्याधिकारी, वरोरा नगर परिषद, यांच्या कार्यालयात, नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात येत आहे.

सदर अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,***

(रा. शा. चौहान)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

C:\2014-2017\Kalam\Notification-5%\खांजी प्र.क्र.310-18.docx

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai – 400 032.**
**Date – 24th January, 2018**

## NOTIFICATION

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*
No.TPS-2217/668/CR-310/2017/UD-9:- Whereas, Revised Development Plan of Warora City has been partly sanctioned by the Government vide Urban Development Department's Notification No. TPS-2212/521(N)/Reco.No.57/C.R.102(A)/2012/UD-9, Dated the 28/12/2012 and has come into force with effect from the 27/01/2013 and Excluded part of Development Plan has been sanctioned by the Government vide Urban Development Department's Notification No. TPS-2212/521(N)/Reco.No.57/C.R.102(A)/2012/UD-9, Dated the 03/01/2015 (hereinafter referred to as "the said Development Plan") under section 31 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") ;

And whereas, in the said Development Plan, land bearing Survey No. 42/1(pt.), 42/2(pt.), 238/2A(pt.), 238/2B(pt.) admeasuring 2.45 Ha. of Mouje Khanji Tal. Warora is reserved for Site No. 70 "Housing for Dis-Housed Persons" are reserved (hereinafter referred to as "the said Reservations") ;

And whereas, the Warora Municipal Council being the Planning Authority (hereinafter referred to as 'the said Planning Authority"), vide its General Body Resolution No. 12, Dated the 13/06/2016 has resolved to delete the land bearing Survey No. 42/1A(pt.), 42/2(pt.), 238/2A(pt.), 238/2B(pt.) admeasuring 6734.75 Sq. Mt. Area from said Reservations and to include the same as in Residential Zone and after following the procedure laid down in the provisions of sub section (1) of section 37 of the said Act, submitted the proposal to the Government, for its sanction (hereinafter referred to as "the Proposed Modification") ;

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that the proposed Modification should be sanctioned subject to certain conditions ;

And whereas, the Owner of the land bearing Survey No. 42/2(pt.), 238/2A(pt.), 238/2B(pt.) of Mouje Khanji of the said Reservation has deposited Rs. 89,450/- towards the 50% Government share of 5% premium amount as per the valuation of the said land as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2017-18 in the Government Treasury Vide chalan No. MH008217543, Dated 14/12/2017 through the Town Planner, Chandrapur Branch, Chandarapur and the remaining 50% of the 5% premium amount of Rs. 89,450/- towards Authority share has been deposited with the Warora Municipal Council, Warora Vide Receipt No. F/104/2099, Dated 21/12/2017 ;

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub section (2) of section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the Proposed Modification subject to certain conditions and for that purpose amends the aforesaid Notification dated the 28/12/2012 ;

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

"In the Schedule of Modifications appended to the Notification sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry –

## ENTRY

"The lands bearing Survey No. 42/2(pt.), 238/2A(pt.), 238/2B(pt.) of Mouja Khanji admeasuring 5588.75 Sq. Mt. are deleted from Site No. 70 "Housing for Dis-Housed Persons" and included in Residential Zone, as shown on the plan, subject to condition specified below –

**Condition No.1-** In the layout of the said land, in addition to open space, necessary Amenity Space shall be provided as per the prevailing Control Regulations of Warora City.

**Condition No.2-** It shall be mandatory for the Land Owner to develop all necessary basic amenities for the said lands at his own cost.

A copy of the Notification, along with the part plan of the aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Chief Officer, Warora Municipal Council, Warora during office hours on all working days.

This Notification shall also be available on the Government web site - www.maharashtra.gov.in

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

(R. S. Chouhan)
**Section Officer to Government**

C:\2014-2017\Kalam\Notification-5%\खांजी प्र.क्र.310-18.docx